पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ०६

**सभावृत्तांत**

**दिनांक - २५/०२/२०२२** **वेळ - दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती पाक्षिक सभा शुक्रवार, दिनांक **२५/०२/२०२२** रोजी दु. ३.०० वा. मा.अवर सचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४, दि.०३ जानेवारी २०२२ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सींगव्दारे) आयोजित करणेत आलेली आहे मा.सभापती, क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती या महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, क्रीडा,कला,साहित्यव सांस्कृतिक समिती यांचे दालनातून सभा संचलित केली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य उपस्थित होते.

**१. मा. उत्तम प्रकाश केंदळे - सभापती**
२. मा. अश्विनी संतोष जाधव
३. मा. बाबर शर्मिला राजू
४. मा. दर्शले रेखा राजेश

----------

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडण्यात आली

सुचक - मा.अश्विनी जाधव अनुमोदक - मा.शर्मिला बाबर

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती (कार्यपत्रिका क्र.०६ ) शुक्रवार दिनांक २५/०२/२०२२ रोजीची पाक्षिक सभा दि.२८/०२/२०२२ रोजी दु.३.०० वा.पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली

----------

**सभापती -** **दि.२८/०२/२०२२ रोजी दु.३.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.**

**( उत्तम प्रकाश केंदळे )**
**सभापती**
**मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी - ४११ ०१८.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - ०६**

**सभावृत्तांत**

**(दिनांक-२५/०२/२०२२ रोजीची तहकूब सभा)**

**दिनांक - २८/०२/२०२२** **वेळ - दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती पाक्षिक सभा सोमवार, दिनांक **२८/०२/२०२२** रोजी दु. ३.०० वा. मा.अवर सचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४, दि.०३ जानेवारी २०२२ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सींगव्दारे) आयोजित करणेत आलेली आहे मा.सभापती, क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती या महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, क्रीडा,कला,साहित्यव सांस्कृतिक समिती यांचे दालनातून सभा संचलित केली आहे सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य उपस्थित होते.

**१. मा. उत्तम प्रकाश केंदळे - सभापती**

२. मा. अश्विनी संतोष जाधव

३. मा. बाबर शर्मिला राजू

४. मा.दर्शले रेखा राजेश

-------------

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.अनिता केदारी - प्र. क्रीडा अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

ठराव क्रमांक - ०७ विषय क्रमांक - ०१

दिनांक - २८/०२/२०२ विभाग - क्रीडा

सुचक - मा.अश्विनी जाधव अनुमोदक - मा.शर्मिला बाबर

संदर्भ - मा. अश्विनी जाधव व मा. शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव.

श्री.रमेश विपट, कार्याध्यक्ष, पुणे जिल्हा आंतर कचेरी क्रीडा संघटना, पुणे यांनी, “संघटनेची सर्वसाधारण सभा सोमवार दि. ०४ ऑक्टोबर २०२१ रोजी कलेक्टर कचेरीमध्ये घेण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी आदरणीय जिल्हाधिकारी व संघटनेचे अध्यक्ष डॉ.राजेश देशमुख हे होते. यावेळेससंघटनेतर्फे २०२१-२२ या आर्थीक वर्षात घेण्यात येणा-या खेळांच्या आर्थिक पुरस्कारां संबंधी विचार विनिमय होवून निर्णय घेण्यात आला. या

सभेमध्ये आपल्या महानगरपालिकेस बॅडमिंटन, कबड्डी, कॅरम (पुरूष), लॉन टेनिस हे चार खेळ आर्थिक पुरस्कारासाठी देण्यात आलेले आहेत. खेळ व त्यासाठी लागणारा खर्च खालील प्रमाणे :-

| अ.क्र | खेळ प्रकार | येणार खर्च रक्कम रूपये |
|---|---|---|
| १ | बॅडमिंटन | ५७,०००/- |
| २ | कबड्डी | १८,७००/- |
| ३ | कॅरम (पुरूष) | २५,०००/- |
| ४ | लॉन टेनिस | ३०,०००/- |
| | एकूण र.रू | **१,३०,७००/-** |

म.न.पा.ने वरील खेळांची पुरस्कारासाठीची रक्कम लवकरात लवकर मंजुरी देऊन अदा करावी तसेच आपल्या महानगरपालिकेचे अनेक खेळाडू संघटनेच्या विविध स्पर्धांमध्ये भाग घेत असून अनेक वेळा ते विजयी अथवा उपविजयी झालेले आहेत."असे कळविले आहे. श्री.रमेश विपट, कार्याध्यक्ष, पुणे जिल्हा आंतर कचेरी क्रीडा संघटना, पुणे यांनी, सन २०१९-२० या वर्षात पार पडलेल्या पुणे जिल्हा आंतर कचेरी क्रीडा स्पर्धेत आपल्या महानगरपालिकेती अधिकारी / कर्मचारी यांनी विविध क्रीडा स्पर्धेत सहभाग नोंदविला होता. त्याचप्रमाणे सन २०२१-२२ या वर्षात होणा-या विविध क्रीडा स्पर्धेसाठी आर्थिक पुरस्कार देणा-यांची नावे सोबत दिलेली आहे असे कळविले आहे. मा.सहाय्यक आयुक्त यांचेकडील आदेश क्र. क्रीडा/४/कावि/५४०/२०२० दि. १५/०१/२०२० अन्वयेकार्याध्यक्ष पुणे जिल्हा आंतर कचेरी क्रीडा संघटना, पुणे ४११००२ यांना १) बॅडमिंटन २) फुटबॉल, ३) लॉनटेनिस, ४) व्हॉलीबॉल या स्पर्धेसाठी म.न.पा. च्या वतीने आर्थिक सहाय्य पुरस्कार र.रू १,१९,०००/- अदा केलेले आहे. या स्पर्धेमध्ये म.न.पा अधिकारी व कर्मचारी सहभागी होत असतात. मा.महापालिका सभा ठराव क्र.४२१ दिनांक १८/१/२०१४ अन्वये म.न.पा. क्रीडा धोरणास उपसुचनासह मान्यता दिलेली आहे. सदर क्रीडा धोरणातील भाग-१ – ब - विविध क्रीडा स्पर्धा पान क्रमांक ११ अनुक्रमांक (६) " **शासकीय, निमशासकीय सहकारी संस्था, औद्योगिक प्रतिष्ठानांमधील कर्मचा-यांसाठी क्रीडा स्पर्धाचे आयोजन करणे**" बाबतचे धोरणातदेशाच्या व राज्याच्या विकासाच्या प्रक्रियेमध्ये आरोग्य संपन्न मनुष्यबळ प्रत्यक्ष /अप्रत्यक्षरित्या परिणाम करत असतो. राज्यातील प्रत्येक नागरिक सुदृढ होण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. आबालवृध्दनागरिकांमध्येआरोग्य संपन्न जीवनाचे महत्व बिंबविण्यासाठी सर्वांगीण विकास साधण्याकरीता क्रीडा स्पर्धा व खेळ यांचे महत्व अनन्यसाधारण आहे. शासकीय, निमशासकीय विभाग, साखर कारखाने, सहकारी संस्था, सूत गिरण्या, महामंडळे औद्योगिक प्रतिष्ठाने याठिकाणी कार्यरत कर्मचा-यांसाठी विविध क्रीडा स्पर्धाचे आयोजन क्रीडा विभागामार्फत करण्यात यावे. कर्मचा-यांची शारीरीक तंदुरूस्ती वकार्यक्षमता वाढीस लागून उत्पादकता वाढीस लागेल. याकामी म.न.पा. परिसरातील कारखाने, कंपन्या, औद्योगिक संस्था यांनी ही स्पर्धा खर्च करण्यासाठी प्रायोजकत्व स्विकारणे आवश्यक आहे. स्पर्धा अनुषंगाने त्यांचे अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य व सहभाग असणे आवश्यक आहे. असे नमुद केलेले आहे. कार्याध्यक्ष,पुना डीस्ट्रीक्ट इंटरऑफिसेस स्पोर्टस असोसिएशन पुणे ४११००२ यांनी सन २०२१-२२मध्ये १) बॅडमिंटन २) कबड्डी ३) कॅरम पुरूष ४) लॉनटेनिस

या ४ क्रीडा स्पर्धांना सन २०२१-२२ करीता म.न.पा.च्या वतीने आर्थिक पुरस्कार देणे कामी आर्थिक सहाय्य र.रू १,३०,७००/- अदा करणेस व सदरचा खर्च क्रीडा निधी- वार्षिक स्पर्धा क्रीडा कला या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मा. क्रीडा कला साहित्य व सांस्कृतिक समिती सभेमार्फत मा. स्थायी समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.सबब कार्याध्यक्ष,पुना डीस्ट्रीक्ट इंटरऑफिसेस स्पोर्टस असोसिएशन पुणे ४११००२ यांनी सन २०२१-२२मध्ये १) बॅडमिंटन २) कबड्डी ३) कॅरम पुरूष ४) लॉनटेनिस या ४ क्रीडा स्पर्धांना सन २०२१-२२ करीता म.न.पा.च्या वतीने आर्थिक पुरस्कार देणे कामी आर्थिक सहाय्य र.रू१,३०,७००/- अदा करणेस व सदरचा खर्च **क्रीडा निधी-वार्षिक स्पर्धा क्रीडा कला** या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मा. स्थायी समिती सभेकडे मान्यतेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

---------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( उत्तम प्रकाश केंदळे )**
**सभापती**
**मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी - ४११ ०१८.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/८५/२०२२
दिनांक - ०३/०३/२०२२

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.